# देवमाणूस नामदेव

## प्रसंग- 'साहित्य अकादमी' पुरस्कारानिमित्त नागरी सत्कार

*दि. ०४-०३-२००१, स्थळ - बालगंधर्व नाट्यगृह, जळगाव*

*नामदेव म्हणजे महाराष्ट्राचे लाडके कवी ना.धों. महानोर; त्यासोबतच लोकप्रिय चित्रपटगीतांचे सृजनकर्ते, लोकगीत व लोकसाहित्य यांचे मर्मज्ञ, ग्रामीण जीवनातील गतिमानता अधोरेखित करणाऱ्या कथा-कादंबरीचे संवेदनशील लेखक. आधुनिक शेतकरी म्हणून त्यांची उभ्या महाराष्ट्राला ओळख आहे. त्यांचे पळसखेड गाव व श्री.भवरलाल जैन यांचे वाकोद ही अगदी वीतभर अंतरावरची गावे. दोघेही तेवढेच जिवलग मित्र. ना.धों. महानोरांना साहित्य अकादमीचा अत्यंत मानाचा पुरस्कार मिळाला. त्या नागरी सत्कारानिमित्ताने श्री. भवरलाल जैन भाऊंनी आपल्या जिवलग मित्राचे रेखाटलेले व्यक्तिचित्र. त्यामध्ये मैत्री तर दिसतेच पण मित्राचे मोठेपण समजते, त्याने झेललेली संकटे कळतात, निसर्गप्रेमाचा समन्वय आढळतो. या भाषणात ना.धों. महानोरांच्या सोबत भाऊंचे आंतरिक बोल व ते मांडण्यासाठी त्यांची आगळीवेगळी भाषा व शैली यांचीसुद्धा उत्कट ओळख होते. दोघांमधल्या भावनिक फुलांना शाब्दिक आविष्कार देणारे हे जिवंत भाषण.*

उपस्थित रसिक जनहो, नामदेववर प्रेम करणाऱ्या भगिनींनो आणि बंधूनो,

मेल्या मेल्या जगाला आपला विसर पडावा असे होऊ द्यायचे नसेल, तर दोनपैकी एक गोष्ट केली पाहिजे असे काहीतरी काम केले पाहिजे, ज्याबद्दल लोक लिहीत राहतील, किंवा असे काही तरी लिहायला पाहिजे, जे लोक वाचत राहतील. आजचा मंच दोन्ही प्रकारच्या लोकांनी सजलेला आहे.

मला नामदेवची खरी आंतरिक ओळख झाली १९९२ मध्ये. त्याआधी १९७२ पासून आमची मैत्री होतीच.... तो दिवस मी आयुष्यात विसरणार नाही... सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत मी त्याच्या शेतात खाटेवर बसून होतो. परिस्थिती गंभीर, घटना काळजाला भिडणारी. प्रसंग : भाऊबंदकीचे हिस्सेवाटे. त्याचे तिन्ही सावत्र बंधू समोर बसलेले. ते अवाजवी, तर्कहीनपणे आणि स्वार्थीपणे बोलत होते. नामदेव मात्र त्यांच्यासमोरच मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे भावंडांबद्दल प्रेमादर ठेवूनच देत होता. विचारले तरच बोलत होता, नाहीतर शांतपणे होत असलेल्या आघातांना सहन करायचा प्रयत्न करीत होता. त्याच्या चेहऱ्यावरुन मी हे जाणू शकत होतो.

आयुष्यभर ज्यांचे भले करण्यासाठी तो काम करीत राहिला, तेच आप्तेष्ट त्याच्यावर स्वार्थीपणाचा आरोप करु बघत होते. नामदेव मात्र त्याकडे दुर्लक्ष करुन त्यांच्यावर प्रेमाची मात्रा अजूनही चालू शकेल का, या प्रयत्नात होता.

जसजसा वेळ जाऊ लागला तस तसा नामदेवने केलेल्या सगळ्या चांगल्या कामांचा त्या भावांना विसर पडल्याचे स्पष्ट होऊ लागले होते. असे असले तरी आपण यांना मदत केली पाहिजे, ही त्याची जिद्द सोडायला तो तयार नव्हता.

आयुष्याच्या उमेदीच्या पहिल्या १०-१२ वर्षात निर्माण केलेले संत्री, मोसंबी, सीताफळे इ. बागबगीचे क्षणभरात त्यांचे होऊन जाणार होते. परंतु निर्मितीचे कार्य आपण परत नव्या जोमाने सुरु करु शकू, याबद्दल त्याचा आत्मविश्वास अढळ होता.

'सर्वस्व पणाला लावून त्यांच्या भल्यासाठी मी झटलो, तरी माझ्या तोंडाला ते काळे फासू पाहत आहेत.' हे आता सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले होते. तरीही आपल्याजवळ असलेले सर्वस्व त्यांना देऊन टाकत असताना नामदेवने क्षणभरसुद्धा मागेपुढे पाहिले नाही.

मित्रहो, माणसाची ओळख सर्वसाधारणपणे त्याने काय काम केले, त्याने कोणती पदे भूषविली यावरुन आपण करीत असतो. नामदेवने आजपर्यंत गेल्या ३५ वर्षात जवळपास फक्त ३५० कविता म्हणजे सरासरी दरवर्षी १० कविता लिहिल्या. त्याप्रमाणे ५२ चित्रगीते लिहिली. छोटेखानी ८ व्यक्तिचित्रे, शेती-पाणी इत्यादींबद्दल पुस्तके लिहिली. या इवल्याशा शिदोरीवर नामदेव पळसखेड्याहून वॉशिंग्टनपर्यंत पोहोचला! कॉलेजची फक्त दोन वर्षे पूर्ण केली. शालेय शिक्षणासाठी पाच वर्षात चार ठिकाणी वणवण फिरत राहिला. १६०० वस्ती असलेल्या गावात राहूनही आपल्या कार्यामुळे 'पद्मश्री' झाला, आमदार झाला. कित्येक वेळा साहित्य संमेलनांचा अध्यक्ष झाला. गदिमा, श्री.पु. भागवत, कोठावळे, संत नामदेव, कुसुमाग्रज, महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार पासून साहित्य अकादमी असे एकूण २४ पुरस्कार त्याला मिळाले. साहित्य किती निर्माण केले, त्यापेक्षा 'कसे' निर्माण केले, त्याचा दर्जा, प्रत यांचे महत्त्व असते, हे त्याने जगाला स्वोदाहरणाने दाखवून दिले.

प्रेमगीतांपासून 'तिची कहाणी', 'पानझड' पर्यंत सगळ्या कवितांचा अभ्यास केला, तर 'नामदेव नेमका आहे तरी कोण?' हा संभ्रम आणखीच जास्त गूढ होत जातो. त्याची ही आणि अशी ओळख माझ्या आधीचे तसेच माझ्या नंतरचे वक्ते संदर्भासहित करुन देणार आहेतच.

मी त्याने काय केले त्याचा ओनामा वाचून दाखविणार नाही. कविता, कथा यांचे मूल्यमापन करणार नाही. त्याने काय केले नाही, हे मात्र आपल्याला सांगणार आहे. माणसाची खरी ओळख करुन घेण्यासाठी ते जाणणे अधिक आवश्यक आहे, असे मी मानतो.

नामदेव खूप मोठा माणूस झाला, सन्मानित झाला, अलंकारीत झाला, प्रख्यात झाला, पण मोठेपण त्याने डोक्यात कधीच शिरू दिले नाही. नामदेव विविध क्षेत्रातल्या मोठमोठाल्या लोकांच्या सहवासात आला— मग ते राजकारणी यशवंतराव चव्हाण असोत की शरदराव असोत. मोठ्यांबरोबर राहूनही त्याने स्वत:ला मोठे समजण्याचा मोह टाळला. समुद्रात राहून कोरडा राहिला. गानकोकिळा लता मंगेशकर असो की आशा भोसले, चित्रपटसृष्टीतील डॉ. जब्बार पटेल असोत की साहित्यसम्राट पुल किंवा कवी कुसुमाग्रज असोत, यांच्याशी त्याने एकच नाते बांधले— त्यांच्या महतपणाला सादर अभिवादन!

जीवघेणे आरोप, निनावी पत्रे, जीवे मारण्याचे प्रयत्न, असह्य वेदना, पीडा यांचे वार तर त्याच्यावर सतत होत राहिले. पण तो गडबडला नाही.

आधीच कवीचे भावुक मन. आतून जसे कापले जात राहिले, तुटत राहिले, पण त्याच्या कवितेने त्याला सांभाळले. कविता त्याची प्रेयसी होती, त्याची आई होती, त्याची मैत्रीण होती, त्याच्या जगण्याचे साधन होती - जगण्याचे कारण होती, नव्हे त्याचे जीवनच होती आणि आहे.

नामदेवने मोठमोठ्यापदांचे पोशाख स्वीकारुन भूषविले, पण आपले मुळचे कपडे सोडले नाहीत. तोच सदरा आणि पायजामा. नाइलाजास्तव एक वेळा अमेरिकेत असताना त्याला पॅन्ट-शर्ट घालावी लागली, पण तासाभरातच त्याने ते कपडे काढून टाकले. बूट-मोजे घालावे लागले, पण त्वरित त्याने आपली चप्पल परत गाठली.

मातकट सदरा, त्याच्या खाली एकदोन छिद्र असलेला बनियन आणि चुरगळलेला पायजामा हा त्याचा 'ट्रेडमार्क' त्याने सोडला नाही. भाषा सोडली नाही, गाव सोडले नाही; शेती सोडली नाही, संस्कृती सोडली नाही; चारित्र्य सोडले नाही, वाईट सवयी जडू दिल्या नाहीत.

साध्यासाठी साधनांची शुचिता त्याने मोडली नाही. चालून आलेल्या प्रसिद्धीमुळे तो झिंगला नाही. प्रसिद्धीसाठी, प्रतिष्ठेसाठी, पैशांसाठी त्याने आपल्या जीनमूल्यांशी तडजोडी केल्या नाहीत.

मित्रांनो, आपण प्रतिष्ठित पदांवर पोहोचत असताना, मोठे होत असताना आपल्या जुन्या मित्रांना, लहानमोठ्या नातेवाईकांना, खेड्यापाड्यातल्या आपल्या जन्मखुणांना विसरत जातो. नामदेवचे तसे झाले नाही. नामदेवने ते केले नाही. यातच नामदेवचा मोठेपणा आहे. त्याने काय केले, यापेक्षाही काय केले नाही, त्याचेच महत्त्व मी जास्त समजतो, असे मी नमूद करु इच्छितो. माणसाने काय केले आणि तो कोठे पोहोचला यावरुन त्याची ओळख करायची झाल्यास, त्याचे मूल्यांकन करत असताना किंवा तो मुक्कामी पोहोचताना अथवा मुक्कामी पोहोचण्यासाठी त्याने पापे केली किंवा नाहीत, फसवणूक केली किंवा नाही जीवनमूल्यांशी प्रतारणा केली किंवा नाही या निकषावरुनच त्याची ओळख व्हावी. अशा पद्धतीने विचार केला तर १० पैकी १० गुणांनी आजपर्यंत नामदेव जीवन जगला, हे मी आग्रहाने आणि खात्रीने आपणापुढे मांडू इच्छितो.

मित्रांनो, मी आपणासमोर उभ्या केलेल्या नामदेवाशी मैत्री ठेवण्यात माझा स्वार्थ आहे. कसा? जे माझ्याजवळ नाही, जे माझ्याजवळ येऊही शकणार नाही ते नामदेवजवळ आहे. त्याच्याकडे बघितले म्हणजे माझ्यात असलेल्या कमतरतांची, उणिवांची मला प्रकर्षाने जाणीव होते. मित्राला जवळ ठेवण्यामध्ये हाच खरा अर्थ आहे. परस्परांच्या ठायी असलेल्या गुणांचे आपण मूल्य करु लागलो, तर आपण किती लहान आहोत हे आपणास सहज कळून येईल. जैन हिल्स्च्या निर्मितीमागे एक गूढ आहे. नामदेवला पळसखेड्यावरून ओढून आणून जळगावसारख्या शहरी वातावरणात रमवायचे असेल तर जैन हिल्स्सारखे वातावरण निर्माण करणे गरजेचे होते. म्हणून जैन हिल्स्च्या निर्मितीमागे नामदेव मला जिवंत उभा राहिल्यासारखा आढळतो. नव्हे, तिच्या निर्मितीचे तो एक महत्त्वाचे कारण आहे. तिथे निसर्ग नागडा उभा आहे आणि म्हणून तिथे नामदेवही आहे.

निसर्ग म्हटला म्हणजे त्यात सुंदरता आहे, अलंकार आहेत, लावण्य आहे. पण त्याबरोबरच नागमोडी पायवाट आहे, दगड-धोंडे आहेत, खळखळणारे झरे आहेत. काटेसुद्धा आहेत, दुःख आहे, वेदना आहे, व्यथा आहे. बस, असेच चित्रण नामदेवने आपल्या कथा, कादंबऱ्या आणि कवितांमधून केले आहे. तो जसा जगला तसेच त्याने लिहिले. चित्रपटांमध्ये प्रेमगीते लिहिणारा नामदेव, 'तिची कहाणी' लिहून समाज अन्यायाचे दर्शन घडवितो किंवा 'पानझड'मध्ये आपल्या जीवन कहाणीला वाचा फोडतो, हे सगळे नैसर्गिकच आहे.

निसर्गाला आपण ईश्वर मानतो. नामदेवचे जीवनकार्य निसर्गाचे प्रतीक आहे. एका शेरमध्ये माझ्या भावना शायराने चांगल्या शब्दात मांडल्या आहेत, तो वाचून आपली रजा घेतो:



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book1_1-28

"कुछ लोगों से जब तक मुलाकात न हुई थी,
मैं भी समझता था, खुदा सबसे बडा है।"

जय हिन्द! जय महाराष्ट्र!



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book1_1-28